महाराष्ट्राचा हक्काचा आवाज

दैनिक बीड **लोकनेता**

● मुख्य संपादक : ज्ञानेश्वर मुंढे ●

Lokneta News - लोकनेता न्युज

मंगळवार दि.५ मे २०२६ RNI-MAHMAR/2023/89402 Email : dnyaneshmofficial@gmail.com वर्ष : ०३ अंक : २६० किंमत २ रुपये 7499615933

प्रतिनिधी नेमणूक सुरु आहे

Epaper: www.dainiklokneta.in/

दैनिक लोकनेता

दैनिक लोकनेता या दैनिकासाठी संपूर्ण महाराष्ट्राभर प्रतिनिधी नेमणूक सुरू आहे तरी इच्छुकांनी खालील इमेल किंवा नंबर वरती संपर्क साधावा. पात्र उमेदवारांना योग्य पदावर संधी देण्यात येईल.

मुख्य कार्यालय: मिरकाळा ता. गेवराई जि.बीड 7046383112

dnyaneshmofficial@gmail.com 7499615933

# सुनेत्रा पवार आणि अक्षय कर्डिले लाखोंच्या मताधिक्याने विजयी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**


राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या निकालानुसार राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार बारामती विधानसभा पोटनिवडणुकीत तर अक्षय कर्डिले राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीत लाखोंच्या मताधिक्याने विजयी झाले. राष्ट्रवादी कॉँग्रेसच्या उमेदवार असलेल्या सुनेत्रा पवार आणि भाजपचे उमेदवार असलेले अक्षय कर्डिले या दोघांच्या दणदणीत विजयामुळे महायुतीने आपल्या दोन्ही जागा राखल्या आहेत. याआधी अजित पवार बारामतीचे तर शिवाजीराव कर्डिले राहुरीचे आमदार होते. पण त्यांच्या निधनामुळे बारामती आणि राहुरी मतदारसंघ रिक्त झाले होते. यामुळेच दोन्ही विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणूक घेण्यात आली.

बारामती विधानसभा मतदारसंघाच्या पोटननिवडणुकीत राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी कॉँग्रेसच्या सर्वोच्च नेत्या सुनेत्रा अजित पवार यांना दोन लाख अठरा हजार ९६९ मते मिळाली. सुनेत्रा पवारांचा २४ फेऱ्यांअखेर दोन लाख अठरा हजार ०३४ मतांनी विजय झाला. त्यांनी नवीन राष्ट्रीय समाज पक्षाच्या प्रो. आर. वाय. घुटुकडे सर यांचा पराभव केला. प्रो. आर. वाय. घुटुकडे सर यांना फक्त ९३५ मते मिळाली. तेच या निवडणुकीतले दुसऱ्या क्रमांकाचे उमेदवार ठरले. बारामतीच्या निवडणुकीत अपक्ष उमेदवार म्हणून बिग बॉस फेम अभिजीत बिचुकले आणि करुणा धनंजय मुंडे हे पण रिंगणात होते. बिचुकले यांना ३३३ तर करुणा धनंजय मुंडे यांना ३०१ मते मिळाली.

राहुरी विधानसभा मतदारसंघाच्या पोटननिवडणुकीत भाजप उमेदवार अक्षय शिवाजीराव कर्डिले यांना एक लाख चाळीस हजार ०९३ मते मिळाली. त्यांचा २७ फेऱ्यांअखेर एक लाख बारा हजार ५८७ मतांनी विजय झाला. त्यांनी गोविंद खंडू मोकाटे या राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार अर्थात राशपच्या उमेदवाराचा पराभव केला. गोविंद मोकाटे यांना २७ हजार ५०६ मते मिळाली. तेच या निवडणुकीतले दुसऱ्या क्रमांकाचे उमेदवार ठरले.




## नायगावच्या भूमिपुत्राची पोलिस दलात दमदार एन्ट्री ; जिद्द-मेहनतीचा विजय



लोकनेता न्यूज नेटवर्क

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील नायगावचे भूमिपुत्र प्रशांत प्रभाकर कुलकर्णी याने महाराष्ट्र शासनाच्या पोलिस भरती प्रक्रियेत उल्लेखनीय यश मिळवत पोलिस दलात आपल्या जिद्दीच्या बळावर दमदार एन्ट्री केली आहे.त्यांची नियुक्ती जिल्हा पोलिस म्हणून मुंबईतील मीरा-भाईंदर येथे झाली असून,या यशामुळे संपूर्ण गावात आनंद व अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

सामान्य कुटुंबातून येत प्रशांतने मोठी स्वप्ने पाहिली आणि ती पूर्ण करण्यासाठी अविरत परिश्रम घेतले.स्पर्धेच्या कठीण टप्प्यांतून मार्ग काढताना त्याने जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वासाने अनेक अडचणींना न जुमानता त्यांनी सातत्याने अभ्यास व शारीरिक तयारी करत हे यश आपल्या नावावर केले.प्रशांतच्या निवडीने नायगावच्या शिरपेचात मानाचा तुरा खोचला असून,केज तालुक्याचे नावही उज्ज्वल केले आहे.त्याच्या प्रेरणादायी प्रवासामुळे अनेक युवकांना नवीन दिशा आणि उमेद मिळणार आहे.प्रशांतच्या निवडीचे सर्व स्तरातून स्वागत केले जात आहे.

## बीडमधील कृषी प्रदर्शन भरकटले; शेतीची अवजारे सोडून 'इग्वाना' बनला मुख्य आकर्षण !

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांना नवनवीन तंत्रज्ञानाची माहिती मिळावी यासाठी भरवण्यात येणाऱ्या कृषी प्रदर्शनांचा मूळ उद्देश बाजूला पडून ती आता 'करमणुकीची जत्रा' बनत चालली आहेत.

बीड येथील छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगणावर सुरू असलेल्या जिल्हास्तरीय कृषी प्रदर्शनात शेतीशी काडीचाही संबंध नसलेल्या विदेशी 'इग्वाना' सरड्यांचा स्टॉल लावण्यात आल्याने शेतकऱ्यांमधून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

१ मे ते ५ मे दरम्यान भरविण्यात येणाऱ्या कृषी प्रदर्शनाचे मोठ्या थाटामाटात राजकीय पुढाऱ्यांच्या हस्ते उद्घाटन सोहळा पार पडला. महाराष्ट्र शासन कृषी विभाग आणि कृषी विकास प्रतिष्ठान गेवराई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कृषी प्रदर्शनाचे सुरूवातीपासूनच मोठ-मोठ्या जाहिरातीद्वारे मुख्य आकर्षण म्हणून दक्षिण अमेरिकेतील साडे ५ फुटी इग्वानाजातीच्या सरड्याची दर्शनी भागात मोठमोठे होर्डिंग्ज लाऊन जाहिरातबाजी करण्यात आली.

मुळात कृषी प्रदर्शन हे शेती मातीशी संबंधित घटकाची माहिती शेतकऱ्याला व्हावी आणि त्यापासून



शेतकऱ्यांनी काहीतरी बोध आणि शिकवण मिळावी यासाठीच कृषी प्रदूषणाची भरवल्या जातात. परंतु सरडा हा कोणत्या शेतकऱ्याच्या कामाला येतो? किंवा ते कोणत्या कामाचे शेत आवजार आहे? हे न उलगडणारे कोडे आहे. शेती पिकातील नवनवीन वाण तसेच नवीन शेती अवजारांच्या याविषयी नवीन नवीन माहिती मिळवण्यासाठी कृषी प्रदर्शनात याची माहिती शेतकऱ्यांना दिली जाते आणि शेतकरी ही त्यासाठीच येतात. परंतु परदेशातील 'सरड्या' आणि तोही कृषी प्रदर्शानात मुख्य आकर्षण म्हणून असावा यासारखी शेतकर्यांची क्रूरचेष्टा कोणती असू शकते.

## गेवराई मतदारसंघात सामाजिक उपक्रमांनी माजीमंत्री बदामराव पंडितांचा वाढदिवस साजरा



लोकनेता न्यूज नेटवर्क

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई विधानसभा मतदारसंघातील भाजप नेत, माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांना दैवत मानणाऱ्या गेवराई तालुक्यातील कार्यकर्ते व नागरिकांकडून दरवर्षी प्रमाणे याही वर्षी मोठ्या उत्साहात त्यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. गेवराई मतदार संघातील भाजप कार्यकर्त्यांनी गेवराई, माजलगाव आणि बीड तालुक्यात विविध सामाजिक उपक्रम राबविले.

भाजपा नेते, माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या निवासस्थानी सौ गिरीकाभाभी पंडित, सौ अनुरूपाताई युधाजित पंडित यांनी औक्षण केले. याप्रसंगी जि.प. चे माजी अर्थ व बांधकाम सभापती युधाजित पंडित, युवानेते रोहित पंडित, युवानेते यशराज पंडित, राजवीर पंडित, नयनतारा पंडित यांची उपस्थिती होती. बदामराव पंडित यांना शुभेच्छा देण्यासाठी सकाळपासूनच शहरासह ग्रामीण भागातील विविध क्षेत्रातील पदाधिकाऱ्यांसह भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिकांनी त्यांच्या निवासस्थानी गर्दी केली होती. बदामराव पंडित यांना दिवसानिमित्त पुस्तके त्यासोबतच वृक्ष, शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन आलेल्या चाहत्यांनी त्यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. यावेळी माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी आलेल्या प्रत्येकाशी अस्थेवाईकपणे चर्चा केली. तालुक्यातल्या प्रत्येक गावात असलेल्या अडीअडचणी याचीही माहिती उपस्थितांकडून घेतली.


दिवसभर व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार व भाजप कार्यकर्त्यांची बदामराव पंडित यांच्या बंगल्यावर त्यांना शुभेच्छा देण्यासाठी मोठी गर्दी केली होती.

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिकाचे गावकऱ्यांना चॅलेंज

लोकनेता न्यूज नेटवर्क

**भूम । रविंद्र लोमटे**

१मे २०२६ रोजी महाराष्ट्र दिन या दिवशी ध्वजारोहणाचा कार्यक्रम झाल्यानंतर शाळेतील सर्व कर्मचारी व शालेय व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी आणि गावकरी यांच्या उपस्थितीमध्ये शालेय व्यवस्थापन समितीची मीटिंग आयोजित करण्यात आली होती या महत्त्वाच्या मीटिंगमध्ये विविध धोरणात्मक विषयावर चर्चा केली मात्र महत्त्वाचा विषय शाळेच्या प्रोसिडिंगवर घेतले जातात परंतु तसे न करता मुख्याध्यापिका यांनी उपस्थित शालेय समितीच्या पदाधिकाऱ्यांना आर्ग्रविच्या भाषेत बोलून मी कोणताही विषय प्रोसिडिंगवर घेणार नाही तुम्हाला काय करायचे ते करा असे म्हणत शालेय व्यवस्थापन समिती व गावकऱ्यांना चॅलेंज केले माझ्या तक्रारी तुमच्याकडे येत आहेत तर तुम्ही माझी बदली करून दाखवा मी मोबाईल सतत बघतच राहणार कारण मला रोज चार चार तास ऑफिशियल काम मोबाईलवर असते .मला विद्यार्थ्यांना शिकवण होत नाही शिष्यवृत्तीचे तास



घेणार नाही तुम्हाला काय करायचे ते कराशालेय समिती व गावकर यांना माझी बदली करून दाखवा असे म्हणत चॅलेंज केले आहे.तालुक्यातील मोजे हाडोंग्री येथील पालक व शालेय समितीचे पदाधिकारी शाळेच्या अधिक गुणवत्तेच्या संदर्भात काही सूचना करण्यासाठी किंवा काही आवश्यक माहिती विचारण्यासाठी विद्यार्थ्यांचे पालन केले असता मुख्याध्यापिका अमृता विठ्ठलराव राऊत यांनी समाधान कारक माहिती तर देतच नाही परंतु मला दिवसाच्या चार चार तास ऑनलाईन मीटिंग असते असे कारण सांगून सतत मोबाईल पाण्यात दंग असतात नागरिकांनी सातत्याने विचारण्याचा प्रयत्न केला असता मला तुम्ही शाळेच्या गुणवत्तेचे विकासाचे काही विचारत जाऊ नका मला वेळ नाही तुम्हाला काय माहिती पाहिजे ते बी ओ ऑफिस मधून घ्या विनाकारण माझा वेळ खराब करू नका अशी भाषा मुख्याध्यापकांनी वापलै व एवढेच नव्हे तर मी आत्ताच्या शाळेच्या मुख्याध्यापिका म्हणून आली आहे मी आणखीन तीन चार वर्षे जाणार नाही त्यामुळे तुम्ही माझ्याशी वाईटपणा पंगा घेऊ नका माझी बदली तर करण्याच्या भानगडीत पडू नका असे खुले आव्हान गावकऱ्यांना केले.

**जोपर्यंत मुख्याध्यापक राऊत यांची बदली होत नाही तोपर्यंत १५ जून च्या नंतर आम्ही शाळेला कुलूप ठोकणार आहोत. श्रीमती राऊत या उर्मट आहे त्या कोणाशीही व्यवस्थित संवाद साधत नाही आणि शाळेला वेळेवर येत नाही त्या सतत मोबाईल मध्ये व्यस्त असतात.**

शालेय व्यवस्थापन समिती व समस्त गावकरी मंडळी यांनी गटशिक्षण अधिकारी पंचायत समिती भूम यांना निवेदन देऊन मुख्याध्यापिका अमृता विठ्ठलराव राऊत यांची बदली करावी आणि जर १२ जून पूर्वी राऊत यांची बदली न केल्यास शाळेला कुलूप ठोकून आंदोलन करण्याचा इशारा ग्रामस्थांच्या वतीने देण्यात आला. या निवेदनावर शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रशांत कदम सरपंच उल्का मगर उपसरपंच लिंबाबाई लोमटे शालेय समितीचे सदस्य सोमेश्वर टेकाळे विक्रम जावळे लता अंधारे आत्मलिंग भरणाळे अमोल तळेकर सुरेखा लोमटे अण्णासाहेब तळेकर रवींद्र लोमटे उपविभागीय दक्षता व नियंत्रण समिती तालुका सदस्य लक्ष्मण कदम ऋषिकेश तळेकर दत्तात्रय कदम बाळासाहेब पाटील कृष्णा शिंदे बलभीम तळेकर बालाजी शिरसागर अमोल कचरे सुरेश शिरसागर गणेश मगर मिथुन चव्हाण संजय चव्हाण एडवोकेट दत्तात्रय जावळे रामा दांगडे मनमत दांगडे श्रीराम क्षीरसागर आश्रुबा कदम सुधीर क्षीरसागर गुप्तलिंग साखरे मनमत तळेकर संकेत समाधान कचरे धनाजी नकाते सागर शिंगटे प्रथमेश तळेकर वैभव तळेकर दादासाहेब सुरवसे यांच्यासह ग्रामस्थांच्या सह्या आहेत.

# खडक मांजरीत महाराष्ट्र दिनी शाश्वत शेतीचा संदेश भव्य सत्कार सोहळ्यात आधुनिक तंत्रज्ञानावर भर

लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । प्रतिनिधी**

लोहा तालुक्यातील खडकमांजरी येथे १ मे रोजी महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या निमित्ताने खडक मांजरी येथे ग्रामपंचायत कार्यालय व जिल्हा परिषद शाळेच्या संयुक्त विद्यमाने समस्त ग्रामस्थांच्या उपस्थितीत भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाला गावातील मान्यवर, शिक्षक, विद्यार्थी, ग्रामसेवक, आशा सेविका, तसेच शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.





यावेळी युवा शेतकरी रत्नाकर पाटील ढगे यांनी मार्गदर्शन करताना बदलत्या हवामान परिस्थितीत शेती टिकवण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याचे आवाहन केले. कमी पाण्यावर येणाऱ्या पिकांची निवड, बेड पद्धतीचा वापर तसेच कृषी विद्यापीठांनी विकसित केलेल्या सुधारित बियाण्यांचा उपयोग करण्यावर त्यांनी भर दिला.

मराठवाड्यातील अनियमित पावसाच्या पार्श्वभूमीवर जलसंधारणाचे महत्त्व अधोरेखित करत 'जलतारा' प्रकल्प लोकसहभागातून राबवण्याचे त्यांनी सुचवले. विहिरींचे पुनर्भरण, पाण्याचा योग्य साठा निर्माण करणे यासाठी श्रमदानाची गरज त्यांनी व्यक्त केली. शेतीसोबत दुग्ध व्यवसायासारख्या पूरक व्यवसायाकडे वळण्याचेही त्यांनी आवाहन केले.जमिनीची सुपीकता टिकवण्यासाठी हिरवळीचे खत, आंतरपीक पद्धतीचा अवलंब करावा, तसेच रासायनिक खतांचा वापर कमी करून सेंद्रिय उपायांचा वापर वाढवावा, असे त्यांनी सांगितले. दशपर्णी अर्क, निंब अर्क, ब्रह्मास्त्र यांसारख्या सेंद्रिय कीडनियंत्रण उपायांसोबत पक्षी थांबे व चिकट सापळ्यांचा वापर करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर वृक्षलागवड व संवर्धन आवश्यक असल्याचे सांगत, कमी पावसातही इस्राईलसारख्या देशांनी साधलेली शेतीतील प्रगती हे प्रेरणादायी उदाहरण असल्याचे त्यांनी नमूद केले. योग्य नियोजन व सकारात्मक दृष्टिकोनातून स्थानिक पातळीवरही मोठी प्रगती साधता येऊ शकते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.याशिवाय, शेतीमालावर प्रक्रिया उद्योग उभारण्याची गरज अधोरेखित करत केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले. सामूहिक विकासासाठी महिला बचत गट, शेतकरी गट तसेच शेतकरी उत्पादक कंपन्या (ऋझज) स्थापन करण्यावर विशेष भर देण्यात आला.या कार्यक्रमाचे आयोजन माजी सरपंच पांडुरंग चौगुले यांच्या संकल्पनेतून करण्यात आले होते. यावेळी रत्नाकर पाटील ढगे यांचा सत्कार गावचे सरपंच - चांदोबा श्रीपती कापसे व माजी सरपंच -पांडुरंग चौगुले, यांनी केला.यावेळी माधव पाटील कापसे, पोलिस पाटील गौतम वाघमारे,माजी सरपंच श्यामराव वाघमारे, चांदोबा एडके,केशव नरवाडे,पत्रकार राजकुमार पिलोळे, चंद्रकांत दरेगावे,यांच्यासह गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमातून शाश्वत शेती, जलसंधारण, पर्यावरण संवर्धन आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराबाबत गावकऱ्यांमध्ये जागरूकता निर्माण झाली असून, एकत्रित प्रयत्नांतून गावाच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## आदर्श माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,बनसारोळा येथील सिध्दार्थ गजानन भोजने यशस्वी



लोकनेता न्यूज नेटवर्क

**केज । प्रतिनिधी**


राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी घेण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनेच्या एन.एम.एम.एस.परीक्षेत आदर्श माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, बनसारोळा येथील विद्यार्थी चि.सिध्दार्थ गजानन भोजने याने उल्लेखनीय यश संपादन केले आहे.या यशामुळे शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेत आणखी भर पडली असून परिसरात त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.सिध्दार्थ भोजने याने कठोर परिश्रम व सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर ही शिष्यवृत्ती मिळवली असून पुढील शिक्षणासाठी त्याला याचा मोठा लाभ होणार आहे.या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळणार आहे.या यशा बद्दल विद्यार्थ्याचे अभिनंदन शाळेचे मुख्याध्यापक बालासाहेब काकडे, संस्थेचे अध्यक्ष अशोकराव काकडे तसेच सर्व शिक्षक वृंद यांनी केले आहे.विद्यार्थ्याच्या पुढील वाटचालीसाठी सर्वांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

## आमदार बबनराव लोणीकर यांच्या मार्गदर्शनाखाली आष्टीत पाइप लाईन दुरुस्ती; काम युद्धपातळीवर, मात्र ग्रामपंचायतीवर प्रश्नचिन्ह

लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । प्रतिनिधी**

श्रीष्ठी येथील तलावातून आष्टी शहराला पाणीपुरवठ करणाऱ्या मुख्य पाइपलाईनमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने गेल्या काही दिवसांपासून अनेक भागांतील पाणीपुरवठा विस्कळीत झाला होता. या पार्श्वभूमीवर आमदार बबनराव लोणीकर यांच्या मार्गदर्शनाखाली आष्टी ग्रामपंचायतीने तातडीने हालचाली करत दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर सुरू केले आहे.सदर कामाची पाहणी सरपंच मधुकर मोरे, उपसरपंच नसरुल्ला खान काकड, तसेच ग्रामपंचायत सदस्य आसिफ कच्छी, बबलू सातपुते आणि इतर सदस्यांनी केली. संबंधित कर्मचाऱ्यांना काम जलदगतीने पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून, लवकरच नियमित पाणीपुरवठा सुरळीत करण्यात येईल, असा विश्वास ग्रामपंचायत प्रशासनाने व्यक्त केला आहे.



दरम्यान, ग्रामविकास अधिकारी डी. बी. काळे यांनी नागरिकांना काही काळ सहकार्य करण्याचे आणि पाण्याचा जपून वापर करण्याचे आवाहन केले आहे.

**मात्र काही प्रश्न उपस्थित**

मुख्य पाइपलाईनमध्ये बिघाड होण्याची ही पहिलीच वेळ आहे का, की यापूर्वीही अशा समस्या वारंवार घडल्या आहेत?

नियमित देखभाल आणि तपासणी वेळेत का करण्यात आली नाही?

बिघाड झाल्यानंतरच प्रशासनाला जाग का येते, पूर्वनियोजनाचा अभाव का दिसून येतो?

पाणीपुरवठ्यासारख्या अत्यावश्यक सेवेसाठी पर्यायी व्यवस्था का करण्यात आली नव्हती?

नागरिकांना त्रास सहन करावा लागल्यानंतरच कामे हाती घेण्याची पद्धत बदलणार का?

स्थानिक नागरिकांमध्ये या प्रश्नांची चर्चा सुरू असून, भविष्यात अशा समस्यांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी ग्रामपंचायतीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

## परळीत सोमवारी मांस विक्री बंदीचा ऐतिहासिक निर्णय; सर्वानुमते ठराव मंजूर

लोकनेता न्यूज नेटवर्क

**परळी वैजनाथ (वार्ताहर)**

परळी नगरपरिषदेच्या दि. ३० एप्रिल २०२६ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत प्रत्येक सोमवारी मांस विक्री बंदी या महत्त्वपूर्ण विषयास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. परळी हे बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक पवित्र तीर्थक्षेत्र असल्यामुळे नागरिक व भाविकांच्या भावना लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला.



यापूर्वी दि. २० एप्रिल २०२६ रोजी झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत हा विषय समाविष्ट करण्यात आला होता. त्यानंतर आजच्या सर्वसाधारण सभेत हा विषय मांडून अंतिम मंजुरी देण्यात आली.

परळी नगरपरिषदेच्या थेट लोकनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्या नेतृत्वाखाली हा निर्णय घेण्यात आला असून, त्यांच्या विकास पर्व २.० या संकल्पनेतून जनभावना, धार्मिक संवेदनशीलता आणि स्थानिक गरजा यांचा समतोल साधणारे प्रशासन दिसून आले. शहराच्या सर्वांगीण विकासाबरोबरच परळीच्या पवित्रतेचा सन्मान राखण्याचा त्यांचा दृष्टीकोन या निर्णयातून अधोरेखित झाला आहे.

या निर्णयासाठी मा. पंकजाताई गोपीनाथराव मुंडे (पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री, महाराष्ट्र राज्य) व मा. आमदार धनंजय मुंडे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच उपनगराध्यक्षा सौ. खैसर राजा खान पठाण, गटनेते तसेच सर्व नगरसेवक-नगरसेविका यांच्या एकमताने हा ठराव मंजूर करण्यात आला.

या संदर्भात सामाजिक कार्यकर्ते श्री. शिवकुमार केदारी (हिंद नगर, परळी वैजनाथ) यांनी या निर्णयाचे स्वागत करत सर्व पदाधिकारी व सदस्यांचे मनःपूर्वक आभार मानले. तसेच या विषयाला व्यापक प्रसिद्धी देणाऱ्या सर्व पत्रकार, ऑनलाइन न्यूज चॅनल व टीव्ही प्रतिनिधी यांचेही त्यांनी विशेष आभार व्यक्त केले.

## पशुसंवर्धन विभागाच्या वतीने सर्व पशुपालक आणि शेतकरी बांधवांसाठी फसवणूकी पासुन सावध राहण्याचे आव्हान-डॉ.संजय नाकलगावकर

लोकनेता न्यूज नेटवर्क

**माजलगाव । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री ग्रामीण उद्योग योजना खाजगी चॅनेलपासून सावध राहा: अनेक खासगी युट्युबर्स, फेसबुक पेजेस किंवा व्हॉट्सप ग्रुप्स या योजनेबद्दल स्वतःच्या फायद्यासाठी चुकीची माहिती किंवा दावे करत आहेत.विभागाचे स्पष्टीकरण: पशुसंवर्धन विभागाने अशा कोणत्याही खाजगी माहितीचे किंवा दाव्यांचे समर्थन केलेले नाही.फसवणूक टाळा: कोणत्याही अनोळखी लिंकवर क्लिक करू नका किंवा खाजगी व्यक्तीला योजनेच्या नावाखाली पैसे/कागदपत्रे देऊ नका.



अधिकृत माहिती कोठे मिळेल?

जर तुम्हाला या योजनेचा लाभ घ्यायचा असेल, तर केवळ खालील अधिकृत मार्गांचाच अवलंब करा: पशुवैद्यकीय दवाखाना: तुमच्या गावातील किंवा तालुक्यातील जवळच्या शासकीय पशुवैद्यकीय दवाखान्यात जाऊन प्रत्यक्ष माहिती घ्या.टोल-फ्री क्रमांक: कोणत्याही शंकेसाठी १९६२ या अधिकृत क्रमांकावर संपर्क साधा.अधिकृत संकेतस्थळ: पशुसंवर्धन विभागाच्या ahd. maharashtra .gov.in या वेबसाईटला भेट द्या. सोशल मीडिया: विभागाच्या अधिकृत (Verified) फेसबुक आणि इन्स्टाग्राम पेजवरूनच माहिती मिळवा. सावध रहा, सुरक्षित रहा. अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत माहितीचाच आधार घ्या.ही माहिती जास्तीत जास्त शेतकरी गटांमध्ये, पशुपालक, शेतमजूर ह्या आपल्या बांधवांना फसवणुकीपासून सावध राहण्याचे आव्हान पशुवैद्यकीय चिकित्सक डॉ. संजय नाकलगावकर यांनी केले आहे.

## ६१ लाख खर्चुनही चारमळीत पाणीबाणी!

लोकनेता न्यूज नेटवर्क

**जळगाव । प्रतिनिधी**

(वा.) मौजे चारमाळी (ता. यावल) येथे केंद्र व राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी जल जीवन मिशन, हर घर जल योजनेचा प्रत्यक्षात पूर्णपणे बोजवारा उडाल्याचे समोर आले आहे. सुमारे ६१ लक्ष दहा हजार २२६ रुपये इतका निधी मंजूर होऊनही गावात आजपर्यंत पाण्याचा एक थेंबही पोहोचलेला नाही, ही अत्यंत संतापजनक बाब आहे. पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री तसेच जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री असलेल्या मंत्र्यांच्या जिल्ह्यातच आदिवासी भगिनींना पिण्याच्या पाण्यासाठी जंगलात भटकंती करावी लागत असल्याची वस्तुस्थिती अत्यंत लज्जास्पद असून प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करत असल्याचा आरोप नवसंजवनी जिल्हा समिती सदस्या प्रतिभा शिंदे यांनी केला आहे. या कामाची पाइपलाइन व इतर कामे अपूर्ण व निकृष्ट दर्जाची करण्यात आली



**तत्काळ टँकरची व्यवस्था करण्याची मागणी**

गर्भवती महिलांनाही पाण्यासाठी पायपीट करावी लागत आहे, ही बाब प्रशासनाच्या संवेदनशून्यतेचे द्योतक आहे. हर घर जल योजना चारमाळीत प्रत्यक्षात हर घर त्रास ठरत असल्याची संतप्त प्रतिक्रिया ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. चारमाळी गावासाठी तात्काळ दररोज पाणी टँकरची व्यवस्था करण्यात यावी जल जीवन मिशन अंतर्गत झालेल्या कामांची उच्चस्तरीय, निष्पक्ष चौकशी असून पाण्याच्या टाकीसाठी केलेली कामे निकृष्ट दर्जाची आहेत. संपूर्ण योजना कागदोपत्री पूर्ण दाखवून प्रत्यक्षात ग्रामस्थांना पाण्यापासून वंचित करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी अपूर्ण व निकृष्ट कामे त्वरित पूर्ण करून पाणीपुरवठा सुरू करण्यात यावा, या प्रकरणाची पालकमंत्र्यांनी स्वतः दखल घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना जाब विचारावा, अशी ठाम मागणी करण्यात येत आहे. ७ दिवसांच्या आत ठोस कार्यवाही न झाल्यास ग्रामस्थांच्या वतीने तीव्र आंदोलनाचा, असा इशारा चारमाळी येथील ग्रामस्थांनी दिला आहे.ठेवले आहे. यामुळे चारमाळी गावातील महिला, लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांना दररोज सुमारे दीड किमी अंतरावरून पाणी आणावे लागत आहे. या कडे अधिकाऱ्यांनी पण लक्ष घालावे अशी मागणी जोर धरत आहे..

## गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर यांच्यावरील दाखल झालेला खोटा गुन्हा न्यायालयाने अखेर रद्द

### तक्रार दाराविरुध्द अब्रु नुकसानीचा दावा दाखल

लोकनेता न्यूज नेटवर्क

**केज । प्रतिनिधी**

गेली २२ वर्षे शिक्षण क्षेत्रात सेवा बजावत असताना दि. ०१/१२/२०२३ पासून केज तालुक्यात गट शिक्षणाधिकारी या पदाचा अतिरिक्त कार्यभार सांभाळत होते या कार्यकाळात २४५ जि.प. व एकूण २६८ शाळांचे कामकाज सुरळीत व पारदर्शक पद्धतीने सुरू होते . तालुक्यातील जनतेने माझ्या कामाची अनेकदा प्रशंसा केली आहे. मला बदनाम करण्याच्या हेतुने श्रीमती लता उमेश शिंदे व पल्लवी उमेश शिंदे, रा. समर्थ नगर, केज यांनी दि. १९/०१/२०२५ रोजी केज पोलीस स्टेशन येथे कलम ७४, ७५(१), ७५(२), ३५४(२), ८, १२ अंतर्गत माझ्या विरुध्द खोटी व बदनामी कारक फिर्याद दाखल केली होती. सदर फिर्याद ही पूर्वनियोजित कट होता माझी सामाजिक व शैक्षणिक प्रतिमा मलीन करण्याच्या उद्देशाने जाणीव पूर्वक करण्यात आली आहे. एक जबाबदार अधिकारी म्हणून मी कायद्याचा व महिलांच्या सन्मान कायम आदर केला आहे. माझ्यावर लावलेले सर्व आरोप बिनबुडाचे, तथ्यहीन व सूडबुद्धीने केलेले आहेत.

या बाबद औरंगाबाद खंडपीठाने दिनांक ५/३ /२०२६ रोजी च्या निकालात सदरील गुन्हा रद्द केला आहेया खोट्या गुन्ह्यामुळे माझी व माझ्या कुटुंबाची नाहक बदनामी झाली असून, मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे माझे वकील ॲड. बी. एल. यादव यांच्यामार्फत दि. २७/०४/२०२६ रोजी संबंधितांवर ५० लाख रुपयांची अब्रु नुकसानीची व ५,००० रुपये नोटीस खर्चाची कायदेशीर नोटीस बजावण्यात आली आहे.

मी माध्यमांना विनंती करतो की, वस्तुस्थितीची शहानिशा न करता कोणते ही एकतर्फी वृत्त प्रसिद्ध करू नये, मी कायद्यावर व न्यायव्यवस्थेवर पूर्ण विश्वास ठेवून कायदेशीर लढाई लढणार आहे.

आसे माजी गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर यांनी व्यक्त केले.

# बाभळगाव येथील दहावीच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा संपन्न


लोकनेता न्यूज नेटवर्क

**जीवन जाधव । औसा**

बाभळगाव येथील दयानंद विद्यालय बाभळगाव ता.जि.लातुर येथे इयत्ता १० 'क' तुकडीचे (बॅच २००६-०७) मधील दहावीच्या माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन आज दिनांक ३ मे २०२६ रोजी उत्साहात पार पडले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जोशी सर होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून वाघमारे सर उपस्थित होते.बाभळगाव येथील या स्नेहसंमेलनाच्या यशस्वी आयोजनासाठी उत्तम जाधव, धनराज औटे , बबन देशमुख, बबिता मस्के, कोमल पतंगे,महानंदा बनसोडे,अनुराधा कांबळे, तसेच इयत्ता १० 'क' मधील सर्व विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोनाली धमाले आणि मारुती कारे यांनी प्रभावीपणे केले.

कार्यक्रमाच्या वेळी सर्व शिक्षकांचा पुष्पगुच्छ आणि शाल श्रीफळ भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. तसेच सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे तोंडभरून कौतुक केले.





कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षकांनी आवर्जून उपस्थिती लावली. या कार्यक्रमाला मुख्याध्यापक फेरे सर यांचीही उपस्थिती लाभली.

एकूणच, हा स्नेहसंमेलन कार्यक्रम आनंददायी वातावरणात आणि विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागातून यशस्वीरीत्या पार पडला.यावेळी गेल्या कित्येक वर्षापासुन वेगळे झालेले अनेक विद्यार्थी कित्येक वर्षानंतर भेटल्याने मन गहिवरुन आले व सर्वांनी त्याकाळच्या दहावी वर्गातील विद्यार्थ्यांनी मनमोकळे पणाने आपापले विचार मांडत मोठ्या जल्लोशात हा स्नेह मेळावा साजरा केला ,यावेळी शिक्षक ,व

सोनाली कदम उत्तम जाधव महानंदा बनसोडे कोमल पतंगे धनराज आवटे बबन देशमुख विनोद मस्के सागर देशमुख बबीता मस्के अनुराधा कांबळे मुकेश जाधव अशोक देशमुख गौतम जाधव व्यंकट हळदे आजरुद्दीन शेख तानाजी निटुरे कोमल पतंगे धनराज आवटे बबन देशमुख विनोद मस्के सागर देशमुख बबीता मस्के अनुराधा कांबळे सह

माजी विद्यार्थी सह उपस्थीत होते ,

# पाचोड ग्रामीण रुग्णालयात रुग्णसेवेचा बोजवारा

लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाचोड । त्रिसिंग जायभाये**

ग्रामीण भागातील गोरगरीब रुग्णांना आरोग्यसेवा पुरविण्यासाठी उभारण्यात आलेल्या पाचोड येथील ग्रामीण रुग्णालयात रुग्णसेवेचा गंभीर बोजवारा उडाल्याचे धक्कादायक वास्तव सोमवारी समोर आले. रुग्णालयातील कर्मचारी कर्तव्यावर उपस्थित असतानाही जखमी रुग्णांकडे साफ दुर्लक्ष केले जात असल्याचे उघड झाले.




सोमवारी सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास बाह्यरुग्ण विभागात दाखल झालेले पाचोड रहिवासी सुमित वाघ यांच्या पायाला गंभीर जखम झाली होती. मलमपट्टी व ड्रेसिंगसाठी जवळपास एक तास प्रतीक्षा केल्यानंतरही एकाही कर्मचाऱ्याने दखल घेतली नाही. अखेर असहाय्य झालेल्या नातेवाईकांनी नर्सिंग कक्षातून स्वतः कापूस व बँडेज घेऊन ड्रेसिंग केले.

*सुमित वाघ म्हणाले -*

जवळपास एक तास वाट पाहिली; परंतु कोणीही लक्ष दिले नाही. शेवटी आम्हालाच स्वतः ड्रेसिंग करावी लागली. रुग्णालयात येऊन उपचार मिळत नसेल, तर आम्ही कुठे जायचे?

नातेवाईकांनी केलेल्या ड्रेसिंगमुळे जखमेला जंतुसंसर्ग होण्याचा गंभीर धोका निर्माण झाला आहे. या प्रकाराबाबत तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा वारंवार प्रयत्न करण्यात आला; परंतु त्यांचा प्रतिसाद मिळू शकला नाही.

## नागरिकांची मागणी

जिल्हा शल्यचिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी तातडीने रुग्णालयाची अचानक भेट घ्यावी, हलगर्जीपणा करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करावी तसेच भविष्यात असे प्रकार घडणार नाहीत यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

# दिग्रसच्या आरोग्यधाम हॉस्पिटल मध्ये ६५ लाखांची अफरातफर

लोकनेता न्यूज नेटवर्क

**किशोर की. कांबळे । दिग्रस**

दिग्रस येथील संत श्री. डी. रामराव महाराज आरोग्यधाम हॉस्पिटल' मध्ये मागील तीन वर्षांपासून सुरू असलेला आर्थिक फसवणुकीचा मोठा प्रकार उघडकीस आला आहे. रुग्णालयातील सॉफ्टवेअरचा गैरवापर करून व्यवस्थापनाची तब्बल ६५ लाख ७४ हजार ४९ रुपयांची अफरातफर केल्याप्रकरणी दोघांवर दिग्रस पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.१ जानेवारी २०२२ ते ४ जून २०२५ या कालावधीत हा अपहार करण्यात आला. आरोग्यधाम हेल्थ केअर प्रा. लि. चे व्यवस्थापकीय संचालक डॉ. संदीप रामरावजी दुधे (वय ५३) यांनी या प्रकरणी फिर्याद दिली आहे. आरोपींनी संगनमत करून हॉस्पिटलच्या सॉफ्टवेअरमध्ये स्वतःचे आणि एकमेकांचे आयडी वापरून हा बनाव रचला. आरोपींनी फिर्यादी व संचालक ॲडमिनचा आयडी व पासवर्ड चोरून त्याचा अनधिकृत वापर केला. रुग्णांकडून तपासणीचे पैसे घेतल्याव त्यांना अधिकृत पावती दिली जात असे. मात्र, रुग्ण पावती घेऊन गेल्यावर आरोपी तात्काळ ती पावती सॉफ्टवेअरमध्ये रद्द करत असत. जमा केलेली रक्कम स्वतःच्या फायद्यासाठी ठेवून, त्या पावत्या दोन-तीन वर्षांपूर्वीच्या तारखेला ढकलून रेकॉर्डमध्ये फेरफार केला जात होता. या प्रकरणात सुजल राजू

**आरोग्यधाम हेल्थ केअर प्रायव्हेट लिमिटेड सेंटरचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. संदीप दुधे वय ( ५३ ) यांनी या प्रकरणी दिग्रस पोलीस स्टेशन फिर्यादी दिली**

नरपासे (वय २२, रा. गांधीनगर) आणि उमेश विष्णुदास राठोड (वय ३५, रा. वाईगौळ, ता. मानोरा) यांच्यासह इतर चार जणांविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. दिग्रस पोलिसांनी या प्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम ३०६, ३१६(४), ३१८(४), ३(५) आणि माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या कलम ६६ (सी) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. अपर पोलिस अधीक्षकांच्या परवानगीनंतर ही कारवाई करण्यात आली आहे

# पेट्रोलपंप चालकांनी साठा उपलब्ध असताना कोणत्याही परिस्थितीत विक्री बंद ठेवू नये

लोकनेता न्यूज नेटवर्क

**लातूर । फिरोज जागीरदार**

लातूर जिल्ह्यामध्ये पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असतानाही, काही पेट्रोल पंप चालकांकडून विनाकारण पंप बंद ठेवले जात असल्याच्या तक्रारी जिल्हा प्रशासनाकडे प्राप्त झाल्या आहेत. ग्राहकांना इंधन नाकारून कृत्रिम टंचाई निर्माण करण्याचा हा प्रकार सार्वजनिक हिताला बाधा आणणारा असून, याची गंभीर दखल घेत प्रभारी जिल्हाधिकारी राहुल कुमार मिना यांनी जिल्ह्यातील सर्व पेट्रोल पंप चालकांसाठी नियमावली जाहीर केली आहे. त्यांनी जिल्ह्यातील पेट्रोलपंप धारकांची दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठक घेवून याबाबत सूचना दिल्या आहेत.

यावेळी जिल्हा पुरवठा अधिकारी व्यंकटेश रावलोड यांच्यासह पेट्रोलपंप चालक व त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

पेट्रोलपंप चालकांनी साठा उपलब्ध असताना कोणत्याही परिस्थितीत विक्री बंद ठेवू नये. तसेच ग्राहकांना इंधन देण्यास कोणत्याही परिस्थितीत नकार देऊ नये. इंधनाची मर्यादित विक्री करणे किंवा कारणाशिवाय अडथळे निर्माण करणे टाळावे. शासनाने ठरवून दिलेल्या विहित वेळेत पंप नियमित सुरू ठेवावेत. पंपावर दर्शनी भागात इंधनाचे दर स्पष्टपणे दिसतील असे फलक लावावेत. स्टॉक आणि विक्रीची नोंद रोजच्या रोज अपडेट असावी आणि तपासणी अधिकाऱ्यांना सर्व नोंदवह्या उपलब्ध करून द्याव्यात. साठा लपविणे किंवा मुद्दाम टंचाई निर्माण करणे हे नियमांचे उल्लंघन मानले जाईल. पंपावर सीसीटीव्ही प्रणाली २४ तास कार्यरत असावी आणि त्याचे रेकॉर्ड प्रशासनास उपलब्ध करून द्यावे, अशा सूचना सर्व पेट्रोलपंप चालकांना यावेळी देण्यात आल्या.

**तालुकास्तरावर विशेष पथके स्थापन**

यानुसार अंमलबजावणीसाठी तालुकास्तरावर विशेष पथके गठीत करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यामध्ये पथक प्रमुख म्हणून संबंधित पुरवठा निरीक्षण अधिकारी, सहायक पथक प्रमुख म्हणून संबंधित पुरवठा निरीक्षक किंवा सहायक महसूल अधिकारी आणि सदस्य म्हणून संबंधित पुरवठा विभागाचे लिपिक-टंकलेखक यांचा समावेश करण्यात आला आहे. ही पथके आपापल्या कार्यक्षेत्रातील पेट्रोल पंपांची अचानक तपासणी करतील.

तपासणी दरम्यान जर एखादा पेट्रोल पंप चालक दोषी आढळला, तर त्यांच्यावर केवळ आर्थिक दंडच नाही तर फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यामध्ये पेट्रोलियम नियम २००२, जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५, भारतीय नागरिक सुरक्षा २०२३ आणि आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील तरतुदींनुसार कडक कारवाई केली जाईल. या आदेशाची प्रत सर्व उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदारांना पुढील कार्यवाहीसाठी पाठवण्यात आली आहे. जिल्ह्यातील तेल कंपन्यांच्या सेल्स ऑफिसर्सनाही या मोहिमेत सहभागी करून घेण्यात आले आहे, अशी माहिती जिल्हा पुरवठा कार्यालयाकडून देण्यात आली.



# राहुरीत विजयाचा जल्लोष; अक्षय कर्डिले यांचा ऐतिहासिक विजय

लोकनेता न्यूज नेटवर्क

**संतोष नरोडे । तिसगाव**

राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीत भाजपचे उमेदवार अक्षय कर्डिले यांनी दमदार कामगिरी करत ऐतिहासिक विजय मिळवला आहे. या विजयामुळे राहुरी तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून कार्यकर्त्यांकडून ठिकठिकाणी जल्लोष साजरा करण्यात येत आहे.



अधिकृत निकालानुसार, अक्षय कर्डिले यांना एकूण १,३९,१२२ मते मिळाली, तर राष्ट्रवादी (SP) चे उमेदवार गोविंद मोकाटे यांना २७,३६८ मते मिळाली. कर्डिले यांनी तब्बल १,११,७५४ मतांच्या फरकाने विजय मिळवत प्रतिस्पर्ध्यांचा पराभव केला.

या विजयाचे श्रेय देताना कर्डिले यांनी मतदारांचे आभार मानले. राहुरीच्या विकासासाठी हे जनतेचे मतदान आहे. पुढील काळात अधिक वेगाने विकासकामे राबवून जनतेचा विश्वास सार्थ ठरवू, असे त्यांनी सांगितले.

निकाल जाहीर होताच भाजप कार्यकर्त्यांनी फटाके फोडून, ढोल-ताशांच्या गजरात आणि गुलाल उधळत आनंद व्यक्त केला. शहरासह ग्रामीण भागातही विजयाच्या मिरवणुका काढण्यात आल्या.

दरम्यान, या निकालामुळे राहुरीतील राजकीय समीकरणांमध्ये मोठा बदल झाल्याचे मानले जात असून, आगामी निवडणुकांसाठी हा निकाल निर्णायक ठरणार असल्याची चर्चा सुरू आहे

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान:विशेष समितीवर सोपान बोंपीलवार यांची निवड;पारदर्शकतेला चालना

लोकनेता न्यूज नेटवर्क

**हिमायतनगर । लक्ष्मण**

महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत ग्रामपंचायतींच्या कामकाजाचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन करण्यासाठी तालुकास्तरीय विशेष समितीची स्थापना करण्यात आली असून, या समितीत हिमायतनगर तालुका मराठी पत्रकार संघाचे माजी तालुकाध्यक्ष तथा दैनिक पुण्य नगरीचे तालुका प्रतिनिधी सोपान बोंपीलवार यांची पत्रकार प्रतिनिधी म्हणून निवड करण्यात आली आहे.

ग्रामपंचायतींच्या कामकाजात पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि गुणवत्ता वाढविण्याच्या उद्देशाने ही समिती कार्यरत राहणार आहे. पत्रकार प्रतिनिधी म्हणून बोंपीलवार यांच्या समावेशामुळे प्रशासनाच्या कामकाजावर प्रभावी व निष्पक्ष नजर ठेवली जाईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

या निवडीबद्दल आमदार माधवराव पाटील जवळगांवकर, नगराध्यक्ष रफिक सेठ, उपनगराध्यक्ष विनोद गुंडेवार,माजी जि प सदस्य सुभाष राठोड, सभापती जनार्धन ताडेवाड, काँग्रेस तालुकाध्यक्ष गजानन सूर्यवंशी, माजी नगराध्यक्ष अखिल भाई,जेष्ठ पत्रकार परमेश्वर गोपतवाड, त्रिरत्नकुमार भवरे, प्रकाश जैन, गोविंद गोडसेलवार, अशोक अनगूलवार, अनिल मादसवार, दत्ता शिराने, मारोती वाडेकर, दत्ता पोपलवाड ,आदी मान्यवरांसह पत्रकार, राजकीय व सामाजिक क्षेत्रातील अनेकांनी अभिनंदन केले आहे.दरम्यान, या नियुक्तीमुळे स्थानिक प्रशासनाच्या कार्यपद्धतीत अधिक पारदर्शकता व जबाबदारी वाढेल, असा विश्वास गटविकास अधिकारी पांडुरंग नारवटकर व स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक विशाल पवार यांनी व्यक्त केला आहे.

समितीची रचना पुढीलप्रमाणे असून, गटविकास अधिकारी - अध्यक्ष, पी. जे. टारपे विस्तार अधिकारी (पंचायत) - नोडल अधिकारी , व्ही एस जामकर, कानिष्ठ अभियंता - सदस्य, ए के कदम ग्रामपंचायत अधिकारी - सदस्य, बी एच ठमके अ्एज - सदस्य यांचा समावेश आहे. ही समिती जिल्ह्यातील इतर तालुक्यातील गावांना भेटी देऊन पारदर्शक कामाकजाचा आढावा घेईल असे सांगण्यात आले आहे.या समितीच्या माध्यमातून ग्रामपंचायतींच्या कामकाजाचे सखोल मूल्यमापन होऊन ग्रामीण विकास प्रक्रियेला अधिक गती मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



# भारजवाडीतील युवकांचा प्रेरणादायी उपक्रम : पीएसआय व पोलीस शिपाई पदावर निवड झालेल्यांचा भव्य सत्कार

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बाळासाहेब खेडकर । पाथर्डी**

भारजवाडी (ता._) येथे गावातील युवकांच्या पुढाकारातून एमपीएससीमार्फत पोलीस उपनिरीक्षक (झडख) पदी निवड झालेले श्री बाबासाहेब अर्जुन बटुळे तसेच पुणे शहर पोलीस दलात निवड झालेले श्री विक्रांत बबन बटुळे यांचा भव्य नागरी सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास गावातील मान्यवर, पालकवर्ग, युवक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

समारंभाच्या प्रारंभी प्रास्ताविक करताना सुशिक्षित युवक श्री चंद्रकांत बटुळे यांनी दोन्ही यशस्वी उमेदवारांचे अभिनंदन करत त्यांच्या खडतर आणि प्रेरणादायी प्रवासाचा आढावा घेतला. त्यांनी गावातील तरुणांनी अशाच प्रकारे स्पर्धा परीक्षा देऊन यश मिळवावे, गावाचा नावलौकिक वाढवावा व दरवर्षी अशा अनेक सत्कार समारंभांचे आयोजन व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

यानंतर श्री अशोक संजय बांगर यांच्या हस्ते नवनियुक्त पीएसआय श्री बाबासाहेब बटुळे यांचा सत्कार करण्यात आला. तसेच उपस्थित पीएसआय श्री संभाजी मोरे यांचा सत्कार मेजर मारुती कराड यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी यशस्वी उमेदवारांच्या पालकांचाही विशेष सत्कार करून त्यांच्या त्याग व परिश्रमांना सलाम करण्यात आला.

गावातील विविध मान्यवरांनी आपल्या भाषणातून या यशाचे कौतुक करताना युवकांना शिक्षण, मेहनत आणि सातत्य यांचे महत्त्व पटवून दिले. ग्रामीण भागातील युवकांनी मोठे स्वप्न पाहून त्यासाठी झटल्यास कोणतीही गोष्ट अशक्य नाही, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

समारंभात मनोगत व्यक्त करताना पीएसआय श्री बाबासाहेब अर्जुन बटुळे यांनी आपल्या संघर्षमय प्रवासाचे अनुभव सांगितले. त्यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी कशी करावी, वेळेचे नियोजन, सातत्यपूर्ण अभ्यास आणि आत्मविश्वास यांचे महत्त्व अधोरेखित केले. जिद्द आणि चिकाटी असेल तर यश नक्की मिळते, असा संदेश त्यांनी युवकांना दिला.

कार्यक्रमाचे सुयोग्य नियोजन युवकांनी केले होते. शिस्तबद्ध आयोजन, उत्साहपूर्ण वातावरण आणि गावकऱ्यांचा मोठा सहभाग यामुळे हा सत्कार सोहळा प्रेरणादायी ठरला. या कार्यक्रमामुळे भारजवाडी गावात शिक्षण व स्पर्धा परीक्षांबाबत सकारात्मक वातावरण निर्माण होऊन अनेक युवकांना नवी दिशा मिळणार असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.समारोप प्रसंगी सर्व मान्यवरांचे आभार मानण्यात आले.




## फेरनोंद प्रकरणात प्रशासनाची टाळाटाळ

# सेवानिवृत पोलीस कर्मचारी राजेंद्र पांचाळ भर उन्हात न्यायासाठी उपजिल्हाधिकारी कार्यालयासमोर

लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर । संतोष चिद्रावार लोणीकर**

देगलूर तालुक्यातील मौजे कावळगुडा येथील सर्वे क्रमांक १९ मधील सुमारे ६ एकर जमिनीच्या फेरनोंद प्रकरणाने गंभीर वादाचे रूप घेतले असून, संबंधित नागरिकाने वारंवार अर्ज, तक्रारी आणि पाठपुरावा करूनही प्रशासनाकडून ठोस निर्णय घेतला जात नसल्याने संताप व्यक्त होत आहे.

सदर प्रकरणात कावळगड्डा येथील अर्जदार राजेंद्र इरन्ना पांचाळ यांनी तहसीलदार, उपविभागीय अधिकारी आणि जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत धाव घेतली आहे. मात्र, १९५५-५६ पासूनच्या नोंदी, १९६९ मधील फेरनोंद, आणि त्यानंतरच्या बदलांमध्ये मोठ्या प्रमाणात तफावत आढळून येत असूनही प्रशासनाकडून अद्याप ठोस कारवाई झालेली नाही.

**कागदपत्रांत स्पष्ट विसंगती, तरीही कारवाई शून्य**

उपलब्ध दस्ताऐवजांनुसार, मूळ अभिलेखातील क्षेत्रफळ आणि नंतरच्या फेरनोंदीत मोठा फरक दिसून येतो. विशेष म्हणजे, काही नोंदी कायद्याच्या तरतुदींना धरून नसल्याचा स्पष्ट दिसून येतो. तहसील कार्यालयाने चौकशीचे आदेश दिले असले तरी, प्रत्यक्षात कोणतीही अंतिम कार्यवाही झालेली नाही. उलट, संबंधित प्रकरणात वर्षानुवर्षे प्रलंबित ठेवण्यात आले आहे.

प्रशासनावर गंभीर आरोप

अर्जदाराच्या म्हणण्यानुसार,
वारंवार अर्ज करूनही प्रशासन केवळ पत्रव्यवहार करत आहे, पण न्याय देण्याची ठोस भूमिका घेत नाही.
यामुळे प्रशासनावर दुर्लक्ष, टाळाटाळ आणि जबाबदारीपासून पळ काढण्याचे आरोप पांचाळ यांच्याकडून होत आहेत. यासाठी सेवा निवृत्त पोलीस कर्मचारी राजेंद्र इरना पांचाळ हे न्याय मागण्यासाठी १ मे महाराष्ट्र दिनाच्या मुहूर्तावर ४० डिग्री तापमानात उष्ण उन्हाच्या लाटा सोसत येथील उपजिल्हाधिकारी कार्यालय देगलूर समोर धरणे आंदोलन करीत न्यायाच्या प्रतिक्षेत आहेत.

**न्याय मिळणार कधी?**

जिल्हाधिकारी कार्यालयाने देखील संबंधित अधिकाऱ्यांना चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. मात्र, प्रत्यक्षात न्याय मिळण्यासाठी अजूनही नागरिकाला प्रतीक्षा करावी लागत आहे.

**न्याय द्या, अन्यथा आंदोलन तीव्र करणार**

संतप्त राजेंद्र पांचाळ यांनी इशारा दिला आहे की, जर लवकरात लवकर योग्य निर्णय घेऊन जमीन नोंदी दुरुस्त केल्या नाहीत, तर मोठ्या आंदोलनाचा मार्ग अवलंबला जाईल. नाईलाजास्तव आत्मदहनचा मार्ग सुद्धा स्वीकारणार असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले आहे.

राजेंद्र पांचाळ यांच्या मागणीचे मुख्य मुद्दे असे आहेत की,
सर्वे नं. १९ मधील जमीन नोंदीत गंभीर तफावत, १९५५ ते २०२६ पर्यंतच्या नोंदींमध्ये विसंगती
तहसील व उपविभागीय कार्यालयाकडून केवळ पत्रव्यवहार
राजेंद्र पांचाळ न्यायासाठी प्रशासनाच्या दारात हेलपाटे मारत आहे. प्रकरणात हेदराबाद कुळ कायदा १९५० अंतर्गत कारवाई अपेक्षित असताना, अधिकाऱ्यांनी केवळ कागदी घोडे नाचवल्याचे चित्र आहे. यामुळे राजेंद्र पांचाळ यांच्यावर जाणीवपूर्वक अन्याय होत असल्याचे दिसून येत आहे.

# गडचांदूरमध्ये आगीचा कहर! नगरसेवक नामवाड यांच्या धडाकेबाज तत्परतेमुळे मोठा अनर्थ टळला

लोकनेता न्यूज नेटवर्क


**चंद्रपुर । सिद्धेश्वर केंद्रे**

गढडचांदूर शहरातील प्रभाग क्रमांक २ मधील मुसा लेआऊट परिसरात आज भीषण उष्णतेमुळे अचानक आग भडकली आणि काही क्षणातच सागवान बागेत धुमसणारा धोका निर्माण झाला. आगीने वेग घेतल्याने परिसरात भीतीचे वातावरण पसरले होते.

मात्र, या संकटाच्या वेळी नगरसेवक हिमांशू नामवाड यांनी दाखवलेली चपळाई आणि तत्परता निर्णायक ठरली. घटनेची माहिती मिळताच त्यांनी क्षणाचाही विलंब न करता घटनास्थळी धाव घेतली आणि परिस्थितीचा ताबा घेतला.

त्यांनी तातडीने गडचांदूर नगरपरिषदेच्या अग्निशामक दलाला सतर्क केले. काही वेळातच अग्निशामक वाहन घटनास्थळी दाखल झाले आणि कर्मचाऱ्यांनी जीवाची पर्वा न करता आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी जोरदार प्रयत्न सुरू केले. अथक मेहनतीनंतर अखेर आगीवर पूर्णपणे मात करण्यात यश आले.

या वेळी मोठ्या प्रमाणात झाडांचे तसेच संभाव्य मालमत्तेचे नुकसान टळले. आग विझल्यानंतर नगरसेवक नामवाड यांनी अग्निशामक दलाच्या




धाडसी कार्याचे कौतुक करत आभार व्यक्त केले. संकटकाळात कर्मचाऱ्यांनी दिलेला त्वरित प्रतिसाद खरोखरच कौतुकास्पद आहे, असे त्यांनी सांगितले. नगरसेवकांच्या या धडाडीच्या कामगिरीमुळे मुसा लेआऊट परिसरातील नागरिकांनी दिलासा व्यक्त करत त्यांचे मनापासून आभार मानले आहेत.

# रायगड किल्ला हा हिंदवी स्वराज्याच्या भविष्याचा पाया ठरला-डॉ.भगवान जायभाये

लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाचोड । त्रिसिंग जायभाये**

छत्रपती शिवाजी महाराज यांनी पराक्रम, दूरदृष्टी, धैर्य आणि अटल धाडसाच्या जोरावर २ मे १६५६ रोजी रायगड किल्ला जिंकला आणि हिंदवी स्वराज्यात सामील केला रायगड किल्ला हा केवळ एक किल्ला नव्हता तर तो हिंदवी स्वराज्याच्या भविष्याचा पाया ठरला असे प्रतिपादन डॉ. भगवान जायभाय यांनी केले. शिवछत्रपती महाविद्यालयामध्ये रायगड किल्ला विजयी दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला त्यावेळी डॉक्टर भगवान जायभाय हे प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे हे होते. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

पुढे बोलताना डॉ. भगवान जायभाय म्हणाले की ६ जून १६७४ रोजी याच गडावर शिवरायांचा राज्याभिषेक झाला. याच गडावरून हिंदवी स्वराज्याचा कारभार करण्यात आला. तसेच या गडाने पुढे स्वराज्याचे अनेक सुवर्णक्षण पाहिले.

छत्रपती शिवाजी महाराज यांनी २ मे १६५६ रोजी जावळीचे चंद्रराव मोरे यांच्याकडून रायगड किल्ला जिंकला आणि स्वराज्यात सामील केला, तो हिंदवी स्वराज्याच्या इतिहासात अभिमानाचा दिवस ठरला. हाच रायगड किल्ला पुढे मराठा साम्राज्याची राजधानी बनला असा रायगड किल्ल्याचा गौरवपूर्ण इतिहास प्राचार्य डॉक्टर चंद्रसेन कोठावळे यांनी विशद केला. ते कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानावरून बोलत होते. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ .शिवाजी यादव यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ . सुभाष पोटभरे यांनी केले. उपस्थितांचे आभार प्रा. गणेश वैद्य यांनी केले. यावेळी बीसीए महाविद्यालयाचे प्राचार्य आप्पासाहेब नेमाने, डॉ हरिप्रसाद बिडवे, भागवत भुमरे, मुरलीधर झिने, मनोज राक्षे, विजय झिने, विद्यार्थी उपस्थित होते.




# पीक विम्यापासून पाच मंडळे वंचित

लोकनेता न्यूज नेटवर्क

**किनवट । शेख शौकत**

प्रधानमंत्री पीक विमा योजना अंतर्गत २०२५-२६ च्या
खरीप हंगामासाठी तालुक्यात पीक विमा मंजूर करण्यात आला असला, तरी प्रत्यक्षात ९ पैकी केवळ ४ महसूल मंडळांतील शेतकऱ्यांनाच लाभमिळाल्याने उर्वरित ५ मंडळांतील शेतकरी अद्याप प्रतीक्षेत आहेत. त्यामुळे तालुक्यात नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

तालुक्यातील शिवणी, बोधडी, दहेली व उमरी बाजार या महसूल मंडळांतील शेतकऱ्यांना पिक विम्याचा लाभ मिळाला आहे. तर सिंदगी मोहपूर, किनवट, मांडवी, जलधरा व इस्लापूर या मंडळांतील शेतकरी अद्यापही विम्यापासून वंचित आहेत. एकाच तालुक्यात काही मंडळांना विमा मंजूर होतो आणि उर्वरित मंडळांना नाही, यामुळे शेतकऱ्यांमध्ये भेदभाव झाल्याची भावना व्यक्त होत आहे. याबाबत संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांकडे चौकशी केली असता प्रकरण अंडर प्रोसेस आहे, लवकरच मिळेल, असे उत्तर दिले जात आहे. मात्र यासंदर्भात ठोस कारणे किंवा कालमर्यादा न दिल्याने शेतकऱ्यांमध्ये संभ्रम कायम आहे. यंदाच्या खरीप हंगामात पावसाच्या अनियमिततेमुळे अनेक भागांत पिकांचे नुकसान झाले आहे. असे असताना काही मंडळांना विमा मिळतो आणि काहींना नाही, यामुळे वंचित शेतकरी प्रश्न उपस्थित करत आहेत. पीक विमा ही शेतकऱ्यांसाठी महत्त्वाची योजना असली, तरी विलंबामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित बिघडत असल्याची भावना व्यक्त होत आहे. प्रशासनाने उर्वरित सर्व पात्र महसूल मंडळांतील शेतकऱ्यांना तात्काळ पीक विमा मंजूर करून रक्कम वितरित करावी, तसेच प्रक्रियेत पारदर्शकता ठेवावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.



# परिवंत गायकवाड यांच्या हस्ते तक्षशिला बुद्ध विहाराचे लोकार्पण आंबेडकरी विचारांनी दुमदुमले क-हेवाडी,महिलांचा उत्स्फूर्त सहभाग

लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

आमदार सुरेश (आण्णा) धस यांच्या प्रयत्नातून सामाजिक न्याय विभागांतर्गत मंजूर झालेल्या क-हेवाडी येथील तक्षशिला बुद्ध विहाराचे लोकार्पण शुक्रवार दि. १ मे २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता भक्तिमय व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. सरपंच परिवंत गायकवाड यांच्या हस्ते उद्धाटन सोहळा संपन्न झाला. भगवान बुद्धांच्या मूर्तीची विधिवत प्राणप्रतिष्ठा करून विहार सर्वांसाठी खुले करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच श्रीमती छाया सुभाष गायकवाड होत्या. प्रमुख उपस्थितीत मा. अरूण (भैय्या) निकाळजे (माजी सभापती, पंचायत समिती आष्टी) यांच्यासह विविध मान्यवरांची उपस्थिती लाभली. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते भगवान बुद्धांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी महिलांचा लक्षणीय व उत्स्फूर्त सहभाग कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या २०२६ च्या संयुक्त जयंतीनिमित्त आयोजित या सोहळ्यात आंबेडकरी विचारांचा जागर आणि सामाजिक समतेचा प्रभावी संदेश देण्यात आला. यावेळी सरपंच परिवंत गायकवाड, माजी नगरसेवक दीपक दादा निकाळजे, बौद्धाचार्य महालिंग निकाळजे, सामाजिक कार्यकर्ते रामभाऊ खाडे व एकपात्री नाटककार क्रांतीचा साक्षीदार रुपेश निकाळजे, यांनी आपल्या भाषणातून समता, बंधुता आणि सामाजिक परिवर्तनाची दिशा अधोरेखित केली.

कार्यक्रमास रिपाइं (आठवले गट) बीड जिल्हाध्यक्ष अरूण भैय्या निकाळजे, सेवानिवृत्त पि आय मिलिंद निकाळजे,पत्रकार अण्णासाहेब साबळे, बंडू बांगर आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी क-हेवाडी येथील भीमसैनिक, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थांनी एकजुटीने परिश्रम घेतले.

तक्षशिला बुद्ध विहाराच्या स्थापनेमुळे क-हेवाडी गावात आध्यात्मिक, सांस्कृतिक व सामाजिक प्रबोधनाचे सक्षम केंद्र उभे राहिले असून, समतेच्या विचारांची पेरणी अधिक व्यापक होणार असल्याचा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.



# शेळगावमध्ये उन्हाळी क्रीडा शिबिरास प्रारंभ




लोकनेता न्यूज नेटवर्क

**शेळगाव । राहुल जाधव**

शेळगाव दि. २ - जिल्हा क्रीडा परिषद, क्रीडा कार्यालय, पुणे व इंदापूर तालुका क्रीडा संकुल तसेच जे.के. क्रीडा प्रबोधिनी, शेळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आणि क्रीडा अधिकारी महेश चावले यांच्या मार्गदर्शनातून आयोजित निवासी उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री माननीय नामदार दत्तात्रय मामा भरणे यांच्या शुभहस्ते झाले.

यावेळी इंदापूर तालुका पंचायत समिती सभापती हर्षवर्धनजी लोंढे, उपसभापती जयकुमार कारंडे, जिल्हा परिषद सदस्या सोनाली ताई जाधव, इंदापूर तालुका पंचायत समितीचे सदस्य, जिल्हा परिषद सदस्य तसेच नगरसेवक, छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक लक्ष्मणराव शिंगाडे , तसेच मोहन दुधाळ, राहुल जाधव, ग्रामपंचायत सदस्य प्रताप चवरे, महेश खराडे,छगन शिंगाडे,ह.भ.प. अनिल महाराज जाधव,सुनील भोंग,विठ्ठल ननवरे हे मान्यवर उपस्थित होते.

जे.के. क्रीडा प्रबोधिनीच्या माध्यमातून अनेक विद्यार्थी हे राष्ट्रीय स्तरावर चमकत आहेत. त्यामुळे ग्रामीण भागात संस्थापक कैलास जाधव सर हे खेळाला प्रोत्साहन देत आहेत. अशी भावना कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन परशुराम मोहिते गुरुजी यांनी केले.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ७४९९६१५९३३ .या अंकात प्रकाशित झालेल्या बातम्या व लेखा या मधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही (वाद विवाद गेवराई न्यायालयाअंतर्गत)

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 7499615933